# प्रेम आणि खूप खूप नंतर : मधुचंद्राच्या गर्तेत अडकलेली कादंबरी

**प्रा. डॉ. बंडु चौधरी**
सहायक प्राध्यापक
मराठी विभाग
समर्थ महाविद्यालय, लाखनी
Email ID :chaudharibandoo87@gmail.com
मो. नं. ९७६५१९२८७८

---

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्यात समाजवास्तवातील वेध घेणाऱ्या महत्वाच्या साहित्यीकापैकी एक म्हणजेच श्याम मनोहर त्यांचा समाजाकडे बघण्याचा दृश्टीकोण, समाजात भेडसावत असलेल्या समस्या त्याअनुशंगाने साहित्यात केलेली मांडणी महत्वपुर्ण ठरते. म्हणूनच प्रस्तुत संषोधन लेखात त्यांच्या प्रेम आणि खुप खुप नंतर कादंबरीतील समाजवास्तव व आजच्या समाजाला लागलेली भ्रामक कल्पणा यांचा मेळ बसतो का त्याच अनुषंगाने समाजाचे वास्तव कादंबरीत अवतरले का याचा षोध घेणे महत्वाचे वाटते.

**अभ्यास निवडीमागील उद्देश :-**

१. मराठी कादंबरी व समाज यांचा अनुबंध लावणे
२. मराठी कादंबरीतील मधुचंद्राची संकल्पणा विषद करणे
३. समाजातील मधुचंद्राची वास्तविकता विषद करणे

श्याम मनोहर यांची 2018 साली पॉप्युलर प्रकाशनाने प्रकाशित केलेली प्रेम आणि खूप खूप नंतर ही कादंबरी नुकतीच वाचनात आली. कादंबरी वाचताक्षणी आजच्या समाजाचे सुन्न करणारे वास्तव करमणूकीच्या नावाखाली माजलेला स्वैराचार त्यातून मानवाच्या मुळ प्रष्नाकडे होत चाललेले दुर्लक्ष. त्याच बरोबर करमणूकीच्या जंजाळात मुलभूत समस्याचा शोध घेण्याच्या वृत्तीकडे होणारे दुर्लक्ष. व त्या समस्यांचा मुळाशी पोहचू पहाणारा प्रतिभावंत त्याला समाजाकडून मिळणारी वागणूक, समाजाकडून होणारी हेटाळणी या सर्व घटनांतून संशोधकाच्या मनात निर्माण होणारी निराशा त्यातूनच न लागलेल्या शोधाचा व त्या प्रतिभवंताचा अंतः याचाच परिणाम बहुसंख्य लोकसंख्या असणाऱ्या देशात इतर जगाच्या तुलनेत प्रत्येक क्षेत्रात कमी दिसणारी प्रतिभावंताची संख्या याचाच परिणाम म्हणून देशाच्या विकासात होणारी खूंट. परिणामी देशातील सर्वसामाण्यांच्या जीवनमानात होणारी घसरण याचेच समर्पक वास्तवचित्रण प्रेम आणि खूप खूप नंतर या कादंबरीत श्याम मनोहरांनी अधोरेखीत केल्याचे दिसते. असे असले तरीही बहुतांश कादंबरी मधुचंद्राच्या हव्यासातच गुरॅडते. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधात प्रेम आणि खूप खूप नंतर या कादंबरीतील आशयतत्वाचा शोध घेणे महत्वाचे वाटते.

प्रेम आणि खूप खूप नंतर या कादंबरीच्या मलपृष्टावर अभिप्राय देताना भास्कर भोळे म्हणतात की,'' श्यामची अशी ठाम धारणा आहे की, सद्यः कालीन व्यापक सामाजिक स्थितीप्रियतेच्या मुळाशी मध्यमवर्गाची बुध्दिविरोधी वृत्ती आहे. आमच्या समाजजीवनाला वैचारीक पाया नाही. आम्हाला ज्ञानप्राप्तीची खरी ओढच नाही. माहितीच्या क्रातीत मग्र असलेला आजच्या समाज ज्ञानसमाजाच्या आदर्शापासून अधिकच दुरावत चालला आहे. आम्ही कोरडे विचार खूपप गिरविले, तत्ववैचारीक उसनवारीही उदंड केली. पण ज्ञान संपादन करून सुधारणा किंवा चळवळी केल्या नाही..... श्यामच्या साहित्याचे पडसाद दीर्घ काळ उठत राहणे अटळ



Research Hub International Journal

आहे'' [१]

यासारख्या अभिप्रायातून कादंबरीतील आशय तत्वाची सुचक कल्पणा येते. कादंबरीतील नायक नरेंद्र हा उच्चभ्रू वर्गातील त्यातही व्यावसाईक क्षेत्राशी निगडीत असणाऱ्या व हॉटेल व्यवसायात स्थिरावलेला आहे. उच्चभ्रू कुटूंबातील असल्याने सर्व सामाण्यांच्या संस्कारापेक्षा वेगळे संस्कार जपणार दर पौर्णिमेच्या दिवशी व्यावसाईक कामे बाजूला सारत कुटूंबाचा कर्ता कुटूंबासोबत वेळ घालवणारा प्रसंगी मुलगा व आईसोबत दारू घेणारा असले तरी कुठेही वाच्यत्ता न करणारे परंतु आपल्या व्यवसायात पुर्णत्वाने पुढे जाणारे अशा कर्त्या वडीलांच्या हाताला हात मिळवित संपुर्ण जगात हॉटेल मॅनेजमेंट विषयात आचार्य पदवीचे शिक्षण घेणारी त्यामुळे दोघांनाही प्रेमाला सुरूवात होते. दोघांच्या जीवणाचे एकच स्वप्न असल्याने सुरूवातीला दिपीकाशी विवाह करण्यास ईच्छुक असणारा पण तिच्या स्पष्ट वक्तव्याने संभ्रात राहणारा सरतेशेवटी विवाह करणारा.

विवाह झाल्यानंतर शारिरीक गरजेपोटी व स्वतःच्या उच्चभ्रूतेमूळे कुणीही ओळखू नये यासाठी बाहेरच्या देशात न जाता जवळच्याच ठिकाणी मधुचंद्रासाठी जाणारी जोडी. व प्रत्येक दिवशी वेगवेगळे शिकण्यासाठी प्रवासाला जाणारी जोडी. मधुचंद्राची वेगळीच परिभाषा मांडून जातात. यासंदर्भात.... नरेंद्र म्हणतो की,'' वंडरफूल झाला मधुचंद्र..... शारिरीक झाला, बौध्दिक झाला, उदयोगाचा झाला, फयुचर ठरले.... मधुचंद्र कसे करावे, हयाची तरूण तरूणींची शिबीरे घ्यायला हवीत.''[२] यासारख्या संवादातून कादंबरीचा नायक केवळ लग्न झाल्यावर शारिरीक गरज भागविण्यासाठी मधुचंद्राला जाऊ नये तर नववैवाहीक जोडण्याने ऐकमेकांचे आचार विचार समजून घेण्यासाठी, भविष्याची प्लॅनींग करण्यासाठी मधुचंद्राला जावे हीच जाणिव आजच्या तरूणांना करून देण्यासाठी शिबीरे घ्यावीत असा मोलाचा संदेष आजच्या तरूणांना देतात.

कादंबरीचा नायक केवळ लग्न झाल्यानंतर शारिरीक गरज पुर्ण करण्याकरिता मधुचंद्राला जात नाही तर संपुर्ण जगात स्वतःची हॉटेलची चैन कशी निर्माण करायची त्यात पत्नीला कसे सामावून घ्यायचे या विचारात नरेंद्राचा मधुचंद्र पुर्ण होताना दिसतो. यासंदर्भात हॉटेलचा मालक सुरज म्हणतो की,''लग्न वगैरे खरा रोमान्स नसतो. मोठा उद्योग उभारणे हाच खरा रोमान्स. पैसा कमाविणे ही एंजॉयमेंट''[३] यासारख्या संवादातून आजच्या पिढीला रोमान्स ही संकल्पणा कुठे वापरावी व अमलात आणावी हे आजच्या शारिरीक आकर्षणाच्या आहारी गेलेल्या पिढीला देतात. ऐवढेच नाही तर '' मोठा उदयोग, खूप खूप पैसा आणि कुटूंबावर प्रेम.... दॅट इज द मीनींग ऑफ लाईक ''[४] यासारख्या संवादातून जीवनाचे तत्वज्ञान मांडून जातात.

एकंदरीत व्यावसाईक दृष्टीकोन बाळगणारा नरेंद्र आपल्या मधुचंद्रात आपला व्यावसाय निश्चित करतो व दिपीकाच्या मदतीने तो वाढवितो. व पहिल्याच मधुचंद्रात ठरविल्या प्रमाणे व्यवसायात स्थिर झाल्यावर दुसरा मधुचंद्र करण्याची कास धरतो. त्यामुळे बहुतांश कादंबरी ही मधुचंद्राच्या गर्तेत अडकून कादंरीकाराला जो आशय मांडायचा असतो त्याला फाटा कुटताना दिसतो. सरतेशेवटी रामानुजवर थोडाफार प्रकाश टाकूल कादंबरी थांबते.

एकदंरीत अतिषय भयाण वास्तव आधुनिक जगाचे मांडण्याचे विचार कादंबरीकाराच्या मनात दिसत असला तरी प्रत्यक्षात कादंबरीत तो तांत्रिक दृष्टया उतरताना दिसत नाही व संपुर्ण कादंबरी मधुचंद्राच्या गर्तेत अडकताना दिसते.

**संदर्भ ग्रंथ :-**


- म्नोहर श्याम, प्रेम आणि खूप खूप नंतर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१८
- तैत्रव, पृ. क्र. १६१